# आर.सी.पटेल फार्मसीच्या विद्यार्थ्यांचे यश



**शिरपूर** : उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या बी. फार्मसी परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून येथील आर. सी. पटेल फार्मसीच्या विद्यार्थ्यांना भरघोस यश मिळाले आहे. प्रथम, तृतीय व चतुर्थ वर्षाच्या परीक्षेत आर. सी.पटेल फार्मसी महाविद्यालयाचे विद्यार्थी विद्यापीठातून प्रथम आलेले आहेत.

प्रथम वर्ष बी.फार्मसीतून मानसी युवराज पवार ९.२६, प्रियांका राजेश पाटील ९.०५, दिव्या अनिल वाघ ९.०५, अनुष्का अतूल बाकोरे ८.९७, तेजल दीपक देवरे ८.९१, नरेंद्र राजू नागपुरे ८.९०, ऋतुजा प्रशांत महाजन ८.८८, नितीन पवन सिंग ८.८६, योगीता कन्हैयालाल राहेजा ८.७९, रोहित प्रवीण पाटील ८.७८, ऋषिकेश तानाजी पवार ८.७७ व लतिका रोहितसिंग गिरासे ८.७६ असे गुण प्राप्त करुन अनुक्रमे प्रथम ते सलग बाराव्या नंबरपर्यंत विद्यापीठात व महाविद्यालयात बाजी मारली.

व्दितीय वर्ष बी.फार्मसीतून वीरश्री साहेबराव पाटील या विद्यार्थिनीने ८.५० गुण प्राप्त करुन महाविद्यालयातून प्रथम तर उमवितून तृतीय क्रमांक पटकावला आहे. उसरे अक्षय हरी व मनाली सुभाष भामरे या दोन्ही विद्यार्थ्यांनी ८.३६ गुण मिळवत महाविद्यालयात द्वितीय व विद्यापीठात अनुक्रमे सहावे व सातवे स्थान प्राप्त केले. स्वप्नील विश्वास पाटील ८. ३१ गुण मिळवून महाविद्यालयात तृतीय तर विद्यापीठात आठवा क्रमांक पटकावला. तृतीय वर्ष बी. फार्मसीतून नूतन गाधारी व पटेल शबनम मुनाफ या विद्यार्थिनींनी ८.३० गुण मिळवत महाविद्यालयात प्रथम क्रमांकाने तर विद्यापीठात अनुक्रमे प्रथम व व्दितीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले. तर कुमारी स्नेहा भिका चौधरी हिने ८.२९ गुण मिळवून महाविद्यालयात व्दितीय व विद्यापीठात तृतीय स्थान पटकावले. ऋचा विजय कोठावदे व किरण हिरालाल पाटील या विद्यार्थ्यांनी ८.२८ गुण मिळवून महाविद्यालयात तिसरे तर विद्यापीठात अनुक्रमे पाचवे व सहावे स्थान पटकावले. अंतिम वर्ष बी. फार्मसीतून पायल अशोक जैन या विद्यार्थिनीने ८.४५ गुण प्राप्त करुन उमवितून व महाविद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला आहे. शुभम सुरेश राठी याने ८.२० गुण प्राप्त करुन महाविद्यालयातून द्वितीय तर उमवितून चौथे स्थान पटकावले आहे. अक्षता सुनील शाह हिने ८.२० गुण मिळवून महाविद्यालयात तृतीय तर विद्यापीठात पाचवे स्थान पटकावले. तसेच उमेश पाटील याने ८.१० गुण मिळवून महाविद्यालयात चौथे तर विद्यापीठात दहावे स्थान पटकावले. विद्यार्थ्यांनी यशाचे श्रेय प्राचार्य डॉ. संजय सुराणा व प्राध्यापकांना दिले. संस्थेचे अध्यक्ष आ. अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, माजी कुलगुरु डॉ. के. बी. पाटील, उप-प्राचार्य डॉ. अतूल शिरखेडकर आदींनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.